<u>वादी तर्फे उलटतपास – श्री. ए. एस. फराकटे वकील.</u>

९. मी सन २००६ पासून दस्तलेखकाचे काम करत आहे. दस्तलेखनासाठी जिल्हा निबंधक यांच्याकडून परवाना घ्यावा लागतो याची मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, जिल्हा निबंधक व जिल्हा मुद्रांक अधिकारी ही दोन वेगवेगळी पदे आहेत. सदर दोन्ही पदे ही एकाच अधिका–याकडे असतात. मी सन २००६ साली दस्तलेखनाचा परवाना घेतला आहे. मी आज तो सोबत आणलेला नाही.

१०. दस्तलेखनाचा परवाना एक वर्षांच्या मुदतीसाठी दिला जातो. त्यामध्ये कोणत्या भागात व कोणत्या दराने काम करायचे आहे या बाबी नमूद केलेल्या असतात. शासनाने दस्तलेखनाचे प्रकार व त्याचे दर ठरवून दिलेले असतात. दस्त लिहिल्याच्या नोंदी रजिस्टरला घ्याव्या लागतात. दस्त लिहिण्यासाठी घेतलेल्या शुल्काची पावती द्यावी लागते. त्या पावतीवरती आणि रजिस्टरवरती ग्राहकाची स्वाक्षरी घ्यावी लागते.

११. माझ्याकडे सन २००९ साली दस्तलेखनाचा नूतनीकरण परवाना होता. मी तो आज सोबत आणलेला नाही. माझ्याकडे सदर दस्त लिहिल्याची व त्याची पावती दिल्याची नोंद आहे. मी त्याबाबतचे रजिस्टर आज सोबत आणलेले नाही. मला न्यायालयाकडून आलेल्या समन्समध्ये कशाबाबत साक्ष दयायची आहे याची माहिती देण्यात आली होती. त्यामध्ये मला साक्षीसाठी आवश्यक असणारे कागदपत्रे घेऊन हजर राहण्याची समज देण्यात आलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला त्याबाबतची माहिती असून देखील सदर नोंदी उपलब्ध नसल्यामुळे मी त्या सोबत आणलेल्या नाहीत.

१२. माझे टंकलेखनाचे प्रशिक्षण झालेले आहे. मी मराठीचे प्रतिमिनिट ४० शब्दांचे टंकलेखन करु शकतो. मला त्याबाबतचे शासनाने प्रमाणपत्र दिलेले आहे. मी ते आज सोबत आणलेले नाही. ज्ञानोबा बाळकू तेजम माझ्याकडे दस्त लिहिण्यासाठी आले तेव्हा त्यांचे वय ७० वर्षे होते. मी त्याबाबत ज्ञानोबाचा एस.

टी. चा सवलत पास पाहिला होता. त्यावरती त्याचे वय नमूद होते. मी तो दस्तासोबत जोडलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, एस. टी. च्या सवलत पासावरती फोटो नसतो.

**१३**. मी ज्ञानोबाला पुर्वीपासून ओळखत होतो. मी त्याचे पुर्वीचे आजरा बँकेचे सन २००४ व २००६ साली तारण दस्त लिहिले होते. मला त्यांच्या तारखा आठवत नाहीत. दस्त करण्यासाठी ज्ञानोबा सोबत सुनिल पांडुरंग भुईंबर, प्रकाश विठोबा तानवडे, भाऊसाहेब दत्तू निर्मळे आणि अनिल पांडुरंग परीट अशा आणखीन चार व्यक्ती आलेल्या होत्या. मी त्यांना देखील पुर्वीपासून ओळखत होतो.

**१४.** माझे कार्यालय शिवाजीराव विठ्ठलराव देसाई यांच्या मालकीचे आहे. माझ्याकडे त्यांना भाडे दिल्याचा पुरावा आहे. मी त्याबाबतच्या पावत्या सादर करु शकतो. दि.११.०९.२००९ रोजी शुक्रवार होता. मला त्या दिवशी या दस्ता व्यतिरिक्त इतर कोणते दस्त लिहिले होते ते आठवत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या कार्यालयामध्ये केवळ एक व्यक्ती बसू शकत असून इतर लोकांना बाहेर व्हरांडयामध्ये थांबावे लागते.

**१५**. मी ज्ञानोबा सोबत आलेल्या चारही लोकांची ओळखपत्रे घेतली होती. मी त्यापैकी केवळ ओळखदार राहिलेल्या दोन लोकांची ओळखपत्रे दस्ताला जोडली आहेत. साक्षीदारांची ओळख दुय्यम निबंधकांसमोर केली जाते. मी दुय्यम निबंधकां समोर गेलो नव्हतो. ज्ञानोबाने मृत्यूपत्र ज्याच्या अधिकारात दिले होते ती व्यक्ती तेथे आलेली नव्हती. मी ज्ञानोबा देत असलेल्या व्यक्तीच्या ओळखीची कागदपत्रे घेतली नव्हती. मी त्याच्या नावाची खात्री करुन घेतली नव्हती.

**१६**. मला ज्ञानोबाने २००९ सालचे उतारे दिले होते. सदरचा दस्त ११.३० वाजेच्या सुमारास लिहिण्यास सुरुवात केली होती. मला तो दस्त लिहिण्यासाठी एक तास लागला होता. मी ज्ञानोबा कडून घेतलेल्या माहितीचे कच्चे टिपण केले होते. ते माझ्याकडे उपलब्ध असून मी हजर करु शकतो. मला ज्ञानोबाने ७/१२

उता–यासह आणखीन काही कागदपत्रे दिली होती. त्याने मला दोन दाव्यांच्या प्रती दाखवल्या होत्या. त्यापैकी एक हुकूमनामा होता व दुसरा चालू वाटपाच्या दाव्या बाबतचा होता.

**१७**. मी त्या दाव्याच्या प्रती मृत्यूपत्राच्या दस्तासोबत जोडलेल्या नाहीत. मला त्याची आवश्यकता न वाटल्यामुळे मी त्या जोडल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या आवश्यकते व मर्जीप्रमाणे दस्त तयार करतो. मला ज्ञानोबाने त्याच्या हौसाबाई व गंगूबाई या दोन पत्नीं बाबत माहिती दिली होती. त्याच्याकडे लग्न नोंदीचे कागद नव्हते.

**१८.** मला ज्ञानोबाचे कुटुंब हिंदू असल्याची माहिती होती. मला दुसरे लग्न बेकायदेशीर असते याची माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी ज्ञानोबाच्या दुस–या पत्नीबाबतचा मजकूर स्वतःच्या मर्जीने लिहिलेला आहे. मी टंकलिखित केलेल्या मृत्यूपत्राच्या दस्ताच्या प्रत्येक पानावरती माझ्या नावाचा दस्तूर घातलेला नाही. त्याने स्थावर मिळकती खरेदी केल्याचे मला सांगितले होते. मी त्याबाबतचे खरेदी कागदपत्रे पाहिली नव्हती.

**१९**. ७/१२ उता–यावरुन मिळकत कशाप्रकारे आली याची माहिती मिळत नाही. मला हुकूमनामा वाचल्यामुळे ज्ञानोबाच्या हिस्सा व हक्काबाबत माहिती होती. मला त्या हुकूमनाम्या प्रमाणे कोणाचा किती हिस्सा होता याबाबत सांगता येणार नाही. मी ज्ञानोबाच्या मुलींच्या जन्माबाबतची कागदपत्रे पाहिली नव्हती. मला त्यांची लग्ने केव्हा झाली याबाबत माहिती नाही. ज्ञानोबाला एक मुलगा आहे.

**२०**. मी दस्त लिहून झाल्यानंतर ज्ञानोबाला वैद्यकीय प्रमाणपत्र आणण्यासाठी पाठवले होते. मी त्याच्यासोबत गेलो नव्हतो. मी १२.३० वाजता दस्त लिहून पुर्ण केला होता. मी तो पुर्ण झाल्यावर त्यावरती साक्षीदारांच्या स्वाक्ष–या घेतल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, मी लिहिलेल्या दस्तामध्ये मला माझा परवाना क्रमांक नमूद करावा लागतो. ज्ञानोबा व साक्षीदारांच्या स्वाक्ष–या झाल्यानंतर ते

डॉक्टरांचा दाखला आणायला गेले होते.

**२१**. हे म्हणणे खरे नाही की, मला ज्ञानोबा मानसिक व शारिरीकदृष्टया सक्षम असल्याची माहिती नव्हती. मृत्यूपत्राला डॉक्टरांच्या दाखल्याची आवश्यकता असल्यामुळे मी त्यांना दाखला आणायला पाठवले होते. मला त्याबाबत वाचून व अनुभवाने माहिती झाली आहे. मी त्याबाबतचा डॉक्टरांचा दाखला पाहिला होता. मी डॉक्टरांच्या दाखल्यावरती ज्ञानोबाची स्वाक्षरी आहे किंवा नाही ते पाहिलेले नाही.

**२२.** हे म्हणणे खरे नाही की, मला ज्ञानोबाच्या स्वाक्षरीबाबत पुर्वीपासून माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे साक्षीदार सुनिल व प्रकाश माझ्यासमक्ष कधीही आले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मृत्यूपत्रासाठी ज्ञानोबा तेजम देखील माझ्या समक्ष आलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, निर्मळे व परीट यांनी माझ्या समक्ष स्वाक्ष–या केलेल्या नाहीत.

**२३**. ओळखदारांच्या स्वाक्ष–या दुय्यम निबंधक घेतात. मी मृत्यूपत्रातील मिळकती बाबत ७/१२ उता–याशिवाय इतर कागदपत्रे घेतली नव्हती. माझी व प्रतिवादी क्र.४ ची ओळख नाही. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीसमन्स काढल्यानंतर मला प्रतिवादी क्र.४ ने भेटून काय पुरावा द्यायचा आहे याची माहिती दिलेली आहे. मला ज्ञानोबाने कांचन आरळगुंडी, ता. भुदरगड गावी असल्याचे सांगितले होते. मला ती काय करते याबाबत माहिती नाही.

**२४**. हे म्हणणे खरे नाही की, मी दुस–या व्यक्तीच्या सांगण्यावरुन अगोदरच ज्ञानोबाच्या मृत्यूपत्राचा दस्त तयार करुन ठेवला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी मृत्यूपत्राचा दस्त कधीही ज्ञानोबा व साक्षीदारांना वाचून दाखवलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदारांनी ज्ञानोबा समक्ष मृत्यूपत्रावरती स्वाक्ष–या केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणाच्याही सांगण्यावरुन कोणतेही दस्त तयार करुन देतो. हे म्हणणे खरे नाही की, मी नि. क्र.२५५ चा दस्त तयार करुन

त्यावरती दस्तूर केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदार माझ्या समक्ष हजर नसून त्यांनी माझ्या समक्ष स्वाक्ष–या केलेल्या नसल्यामुळे मी त्या ओळखू शकत नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**<u>प्रतिवादी क्र.२ तर्फे उलट तपास – श्री. व्ही. आर. पाटील वकील</u>.**

**२५**. प्रतिवादी क्र.२ तर्फे वादीच्या विधिज्ञांनी घेतलेला उलट तपास स्विकारण्यात आला आहे.

**<u>प्रतिवादी क्र.९ व १० तर्फे उलट तपास – श्री. एस. एम. देशपांडे वकील</u>.**

**२६.** प्रतिवादी क्र.९ व १० तर्फे उलटतपास नाकारला.

**<u>प्रतिवादी क्र.११ ते १५ तर्फे उलट तपास – श्री. व्ही. बी. कडूकर वकील</u>.**

**२७**. प्रतिवादी क्र.११ न्यायालयात हजर. त्यांचे वकील गैरहजर. प्रतिवादी क्र.११ तर्फे उलट तपास घेण्यास नकार. सबब, उलट तपास नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – ०५.०८.२०२५.	दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.